Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

# माहिती तंत्रज्ञानाचा ग्रामीण भागातील स्त्रियांवर झालेल्या परिणामांचा अभ्यास

**शिवराणी भिमराव भुस्से**
संशोधिका

**प्रा.डॉ. संदीप रामराव गोरे**
संशोधक मार्गदर्शक
प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख
श्री योगानंद स्वामी महाविद्यालय, वसमत
जिल्हा हिंगोली

**प्रस्तावना**

२१ व्या शतकात संगणकांच्या व्यवहाराला पारदर्शक व विश्वसनीय साथ मिळाली आहे. संगणकामुळे अतीशय कमी वेळात गुंतागुंतीची माहिती, आकडेवारी बिनचूक आणि चुकांवर अत्यंत प्रभाविपणे नियंत्रण ठेवून आकडेमोड केली जाते. माहिती स्विकारणे, ती साठवणे, त्यावर प्रक्रिया आणि निष्कर्ष काढण्याची प्रक्रिया संगणकात होते. मराठी विश्वकोशा नुसार, 'संगणक हे सांकेतिक स्वरुपातील माहितीवर संस्करण करणारे एक इलेक्ट्रॉनिक यंत्र आहे. एकंदरीत संगणकाद्वारे कच्च्या स्वरुपात प्राप्त झालेल्या माहितीवर प्रक्रिया करुन ती माहिती समजण्यायोग्य प्रारुपात सादर करते. संगणकात गुणात्मक आणि संख्यात्मक माहिती पुरविली जाते. संगणकामुळे व्यक्तीला निर्णय घेण्यात मदत करण्याबरोबर माहिती साठवणे आणि गरज पडेल तेव्हा ती माहिती उपलब्ध करुन देण्याचे कार्य अतिशय जलद गतीने केले जाते. म्हणून संगणकास विद्वानापासून ते सर्वसामान्य व्यक्तींचा पाठिंबा मिळालेला दिसून येतो. यामध्ये विकसित व विकशनशील आणि अविकसीत राष्ट्रांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. माहिती तंत्रज्ञानाची ग्रामीण भागातील स्त्रियांना माहिती आहे का यांचा अभ्यास करणे.
२. माहिती तंत्रज्ञानाच्या कोणत्या साधनाचा उपयोग केला जातो यांचा अभ्यास करणे.
३. माहिती तंत्रज्ञानामुळे स्त्रियांच्या गृहकार्यावर कोणता परिणाम झाल यांचा अभ्यास करणे.
४.


**माहिती तंत्रज्ञानाची माहिती आहे का ? यांच्या माहितीचा तक्ता**

| अ.क्र. | होय / नाही | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | होय | २७३ | ९१.०० % |
| २. | नाही | २७ | ०९.०० % |
| | **एकूण** | **३००** | **१००.०० %** |

स्त्रोत: प्रत्यक्ष मुलाखत अनुसूची

वरील तक्ता व वर्तुळमध्ये माहिती तंत्रज्ञानाची माहिती आहे का नाही यांची माहिती देण्यात आली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, २७३ उत्तरदात्यांनी माहिती तंत्रज्ञानाची माहिती आहे असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ९१ टक्के आहे. तर २७ उत्तरदात्यांनी माहिती तंत्रज्ञानाची माहिती नाही असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ९ टक्के आहे.

**माहिती तंत्रज्ञानाची माहिती आहे का ? यांच्या माहितीचे प्रमाण दर्शविणारे वर्तुळ ?**




१९८५ मध्ये भारताचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी माहिती तंत्रज्ञानाच्या धोरणाचा स्वीकार केला. त्यामुळे देशात बँका, शासकीय कार्यालये, पोस्ट ऑफिस, तहसिल, पंचायत समिती, ग्रामपंचायत, सेतू सुविधा केंद्र, आरोग्य कार्यालय इत्यादी ठिकाणी माहिती तंत्रज्ञानाचा दैनंदिन कार्यात उपयोग करण्यात आला. त्यामुळे ग्रामीण भागातील शासकीय, आरोग्य आणि बँकेचे इत्यादी कामे माहिती तंत्रज्ञानाच्याद्वारे होत असल्याने स्त्रीचा सहसंबंध माहिती तंत्रज्ञानाशी आलेला दिसून येतो.


**माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमाचा वापर करता का ? यांच्या माहितीचा तक्ता**

| अ.क्र. | कोणत्या साधनांचा वापर करता | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वृत्तपत्र | ०६ | ०२.०० % |
| २. | रेडिओ | १५ | ०५.०० % |
| ३. | दूरदर्शन | १९ | ०६.३३ % |
| ४. | संगणक | ०२ | ००.६६ % |
| ५. | मोबाईल | १३६ | ४५.३३ % |
| ६. | डि.टी.एच. | ११३ | ३७.६६ % |
| ७. | वरील सर्व | ३९ | १३.०० % |
| ८. | यापैकी नाही | ०९ | ०३.०० % |
| | **एकूण** | **३००** | **१००.०० %** |

स्त्रोत: प्रत्यक्ष मुलाखत अनुसूची

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

**माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमाचा वापर करता का ? यांच्या माहितीचे प्रमाण दर्शविणारा स्तंभालेख**




वरील तक्ता व स्तंभालेखमध्ये माहिती तंत्रज्ञानाच्या कोणत्या माध्यमांचा उपयोग करता यांची माहिती देण्यात आली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, १३६ उत्तरदात्यांनी मोबाईल या माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ४५.३३ टक्के आहे. ११३ उत्तरदात्यांनी डि.टी.एच. या माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ३७.६६ टक्के आहे. १९ उत्तरदात्यांनी दुरदर्शन या माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ६.३३ टक्के आहे. १५ उत्तरदात्यांनी रेडिओ या माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ५ टक्के आहे. ६ उत्तरदात्यांनी वृत्तपत्र या माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण २ टक्के आहे. २ उत्तरदात्यांनी संगणक या माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ०.६६ टक्के आहे. ३९ उत्तरदात्यांनी वरील सर्व माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १३ टक्के आहे. तर ९ उत्तरदात्यांनी यापैकी कोणत्याच माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ३ टक्के आहे.

एकंदरीत ग्रामीण भागातील स्त्रियांच्या माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांची माहिती बघितली असता मोबाईल या साधनांचा सर्वाधिक वापर होताना दिसून येतो. तर त्यानंतर डि.टी.एच. या साधनांचा वापर केला जातो. डि.टि.एच. वरील वेगवेगळ्या चॅनलवरील मालिका, सिरीयल यांची आवड स्त्रियामध्ये झाली आहे. तसेच तासनतास मोबाईल मध्ये व्हाटस्प, इंस्टाग्राम, फेसबूक यांचीही सवय झालेली दिसून येते. या सर्व माहिती तंत्रज्ञानाच्या साधनापासून केवळ ३ टक्के स्त्रिया अलिप्त आहेत.

**माहिती तंत्रज्ञानामुळे स्त्रियांच्या गृहकार्यावर कोणता परिणाम झाला ? यांच्या माहितीचा तक्ता**


| अ.क्र. | सुविधा | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | दळण दळणे | ३०० | १००.०० % |
| २. | दाळ करणे | २९६ | ९८.६६ % |
| ३. | शेवया करणे | २२१ | ७३.६६ % |
| ४. | कपडे धुने | ०७ | ०२.३३ % |
| ५. | पाणी भरणे | २६४ | ८८.०० % |
| ६. | सारवण करणे | २७७ | ९२.३३ % |
| ७. | सडा टाकणे | २७९ | ९३.०० % |
| ८. | चुलीवर स्वंयपाक करणे | १५० | ५०.०० % |
| ९. | दीवा लावणे | ३०० | १००.०० % |

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

| अ.क्र. | सुविधा | उत्तरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १०. | गोदडे शिवणे | २८७ | ९५.६६ % |
| ११. | इस्तरी करणे | ३०० | १००.०० % |
| १२. | पाणी तापविणे | १८९ | ६३.०० % |
| १३. | मिरचू वाटणे | २६९ | ८९.६६ % |
| १४. | वरील सर्व | २८१ | ९३.६६ % |
| | **एकूण** | **३००** | **१००.०० %** |

स्त्रोत: प्रत्यक्ष मुलाखत अनुसूची

**माहिती तंत्रज्ञानामुळे स्त्रियांच्या गृहकार्यावर कोणता परिणाम झाला ? यांच्या माहितीचे प्रमाण दर्शविणारा स्तंभालेख**




वरील तक्ता व स्तंभालेखामध्ये परभणी जिल्ह्यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा ग्रामीण भागातील स्त्रियांच्या गृहकार्यावर कोणता परिणाम झाला यांची माहिती देण्यात आली आहे. यावरून असे स्पष्ट होते की, ३०० उत्तरदात्यांनी माहिती तंत्रज्ञानामुळे लाईटवर चालणाऱ्या पिठाच्या गिरण्या आल्यामुळे जात्यावर दळण दळणे बंध झाल्याचे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १०० टक्के आहे. २९६ उत्तरदात्यांनी माहिती तंत्रज्ञानामुळे लाईटवर चालणाऱ्या दाळ करावयाच्या गिरण्या आल्यामुळे जात्यावर दाळ करणे बंध झाल्याचे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ९८.६६ टक्के आहे. तर उत्तरदात्यांनी जात्यावर दाळ करणे चालू आहे असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १.३४ टक्के आहे. २२१ उत्तरदात्यांनी माहिती तंत्रज्ञानामुळे लाईटवर चालणाऱ्या शेवया करावयाच्या गिरण्या आल्यामुळे हाताने बोटवे करण्याचे काम बंध झाल्याचे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ७३.६६ टक्के आहे. तर ७९ उत्तरदात्यांनी शेवया करावयाच्या गिरण्यावरच बोटवे केले जाते असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण २६.३४ टक्के आहे. ७ उत्तरदात्यांनी माहिती तंत्रज्ञानामुळे लाईटवर चालणाऱ्या कपडे धुण्याच्या वाशिंग मशीन आल्यामुळे हाताने कपडे धुण्याचे काम बंध झाल्याचे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण २.३३ टक्के आहे. तर २९३ उत्तरदात्यांनी हातानेच कपडे धुले जातात असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ९७.७७ टक्के आहे. २६४ उत्तरदात्यांनी माहिती तंत्रज्ञानामुळे घरोघरी नळ योजना झाल्यामुळे पाणी डोक्यावरून भरणे बंध झाल्याचे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ८८ टक्के आहे. तर ३६ उत्तरदात्यांनी आजही पाणी डोक्यवरूनच भरले जाते असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १२ टक्के आहे. २७७ उत्तरदात्यांनी माहिती तंत्रज्ञानामुळे घरोघरी कोबा

किंवा फरशी करण्यात आल्यामुळे सारवण करण्याचे काम बंध झाल्याचे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ९२.३३ टक्के आहे. तर २३ उत्तरदात्यांनी आजही घरात सारवण केले जाते असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ७.६७ टक्के आहे. २७९ उत्तरदात्यांनी माहिती तंत्रज्ञानामुळे घराच्या अंगणात कोबा किंवा फरशी केली आहे तसेच रस्ता देखील काँकीटचा झाल्यामुळे शेणाचा सडा टाणे बंध झाल्याचे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ९३ टक्के आहे. तर २१ उत्तरदात्यांनी आजही शेणाचा सडा टाकला जातो असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ७ टक्के आहे. १५० उत्तरदात्यांनी माहिती तंत्रज्ञानामुळे चुलीवर स्वंयपाक करणे बंध झाल्याचे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ५० टक्के आहे. तर १५० उत्तरदात्यांनी वाढती महागाईमुळे गॅसच्या किमती वाढल्यामुळे गॅस ऐवजी चुलीवरच स्वंयपाक केला जात असल्याचे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ५० टक्के आहे. ३०० उत्तरदात्यांनी माहिती तंत्रज्ञानामुळे घरोघरी लाईट पोहोचल्यामुळे दीवा लावण बंध झाल्याचे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १०० टक्के आहे.

२८७ उत्तरदात्यांनी माहिती तंत्रज्ञानामुळे कपडे किंवा गोदडे शिवण्याच्या शिलाई मशीन आल्यामुळे गोदडे शिवण्याचे काम बंध झाल्याचे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ९५.६६ टक्के आहे. तर १३ उत्तरदात्यांनी आजही हाताने गोदडे शिवते असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ४.३४ टक्के आहे. ३०० उत्तरदात्यांनी माहिती तंत्रज्ञानामुळे लाईटवर चालणारी कपड्याला इस्तरी करावयाची मशीन आल्यामुळे कोळशावर इस्तरी करणे बंध झाले म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १०० टक्के आहे. १८९ उत्तरदात्यांनी माहिती तंत्रज्ञानामुळे पाणी तापविण्याचे गीझर किंवा हिटर आल्यामुळे चुलीवर किंवा वतलावर पाणी तापविण्याचे बंध झाले असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ६३ टक्के आहे. तर १११ उत्तरदात्यांनी आजही वतलावर पाणी तापविले जाते असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ३७ टक्के आहे. २६९ उत्तरदात्यांनी माहिती तंत्रज्ञानामुळे वाळलेल्या मिरच्या वाटावयाच्या लाईटवर चालणाऱ्या गिरणी किंवा मिरची कांडप आल्यामुळे खलबत्यात मिरच्या वाटण्याचे काम बंध झाल्याचे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ८९.६६ टक्के आहे. तर ३१ उत्तरदात्यांनी आजही खलबत्यात मिरचू वाटले जाते असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण १०.३४ टक्के आहे. २८१ उत्तरदात्यांनी माहिती तंत्रज्ञानामुळे लाईटवर चालणारे वेगवेगळे साधने आल्यामुळे ग्रामीण भागातील स्त्रियांच्या गृहकामावर परिणाम झाल्याचे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ९३.६६ टक्के आहे. तर १९ स्त्री उत्तरदात्यांनी आजही पारंपरिक गृह उपयोगी साधनाद्वारेच कामे केले जातात असे म्हटले असून त्यांचे शेकडा प्रमाण ६.३४ टक्के आहे.

एकंदरीत माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांचा ग्रामीण भागातील दळण दळणे, दीवा लावणे, इस्तरी करणे या कामावर १०० टक्के परिणाम झाला आहे. तर दाळ करणे ९८.६६ टक्के, सारवण करणे ९२.३३ टक्के सडा मारणे ९३ टक्के, गोदडे शिवणे ९५.६६ टक्के या प्रमाणात माहिती तंत्रज्ञानाचा परिणाम झाला आहे. यावरून असे म्हणता येईल की, पारंपरिक काही अपवाद वगळता ग्रामीण भागातील स्त्रियांच्या जीवनावर गृहउपयोगी कामावर माहिती तंत्रज्ञानाचा परिणाम झाल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**

१. मुलाखत अनुसूची
२. विठ्ठल एन, (२००७), 'माहिती तंत्रज्ञान आणि शासन प्रशासन', योजना (मराठी आवृत्ती), नोव्हेंबर, ७०१, बी विंग ७ वा मजला, केंद्रिय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई
३. भटकर विजय, (२००७), 'माहिती व दूरसंचार तंत्रज्ञान भारताची भरारी', शिक्षण संक्रमण, फेब्रुवारी, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, शिवाजी नगर, पुणे-४११००५
४. शिकारपूर दिपक आणि मराठे उज्ज्वल, (२००४), 'अधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या विश्वात', प्रकाशन सौ. सविता सु. जोशी, उत्कर्ष प्रकाशन, डेक्कन जिमखाना, पुणे
५. पचौरी सुधीश, (1994), दूरदर्शन-दशा और दिशा, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, नवी दिल्ली
६. Ravindran R.K., 1999, Media and society, comman wealth publisher, New Delhi